।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.२ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ६ वा


## श्री.अंबिकादेवी यात्रेनिमित्त शेतीमाल प्रदर्शन व विविध स्पर्धांचे आयोजन



सांगोला : श्री.अंबिकादेवी यात्रा व प्रदर्शन समिती, सांगोला यांचेवतीने श्री.अंबिकादेवी यात्रा निमित्त आजपासून शेतीमालाचे प्रदर्शन व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कोर्ट रिसिव्हर्स अंबिकादेवी यात्रा व प्रदर्शन समिती, सांगोला यांचेवतीने देण्यात आली. आज शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी शेळ्या मेंढ्या व सर्वप्रकारचा बाजार भरणार आहे.

रविवार दि.२ फेब्रुवारी व सोमवार दि.३ फेब्रुवारी रोजी सर्व प्रकारचा बाजार व विविध स्पर्धा होणार आहेत. मंगळवार दि.४ फेब्रुवारी रोजी रथसप्तमी महापूजा, महानैवेद्य व रात्री ९ वा. भजनाचा कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. गुरुवार दि.६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. शेतीमालाची निवड करण्यात येणार आहे.

शुक्रवार दि.७ फेब्रुवारी रोजी सायं.५ वाजता बक्षीस समारंभ सायं.७ वाजता शोभेच्या दारूकामाने सांगता करण्यात येणार आहे. रविवार दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता इ.१ ली ते ४ थी गटासाठी रंगभरण स्पर्धा, इ.५ वी ते.७ वी गटासाठी चित्रकला स्पर्धा व इ.८ वी ते १० वी गटासाठी चित्रकला स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे. सोमवार दि.३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता इ.५ वी ते ७ वी गटासाठी ठिपक्यांची रांगोळी, इ.८ वी ते इ.१० वी गटासाठी ठिपक्यांची रांगोळी तर खुला गटासाठी संस्कार भारती स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे. मंगळवार दि.४ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता १७ वर्षेखालील मुलासाठी मिनी मॅरेथॉन, १७ वर्षाखालील मुलीसाठी ३ किमी धावणे स्पर्धा तर खुला गट मुले व मुलींसाठी ५ किमी धावणे स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे.

७ फेब्रुवारी रोजी सायं.५ वाजता श्री.अंबिकादेवी पालखीची यात्रेतून मिरवणूक काढण्यात येणार आहे. यात्रा कालावधीत श्री दत्त महिला भजनी मंडळ (महादेव गल्ली), यमाई महिला भजनी मंडळ (देशपांडे गल्ली), श्रीराम महिला भजनी मंडळ (महादेव गल्ली), श्री विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ (वज्राबाद पेठ), जय तुळजाभवानी महिला भजनी मंडळ (वज्राबाद पेठ), श्री विठ्ठल महिला भजनी मंडळ (कोष्टी गल्ली), ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ (वासूद रोड), स्वामी समर्थ भजनी मंडळ (कुंभार गल्ली), साई महिला भजनी मंडळ (वासूद रोड), बसवेश्वर भजनी मंडळ (मेन रोड), , दत्त भजनी मंडळ (पुजारवाडी), चौंडेश्वरी भजनी मंडळ (कोष्टी गल्ली), रुद्र भजनी मंडळ (सांगोला), श्रीराम महिला भजनी मंडळ, एखतपूर आदी भजनी मंडळाचे भजन होणार आहे. अधिक माहितीसाठी कोर्ट रिसिव्हर सहाय्यक सरकारी वकील ॲड.सारंग वांगीकर, ॲड.विक्रांत बनकर, ॲड. विशालदीप बाबर, ॲड.नितीन बाबर, ॲड.सौ. शशिकला खाडे , ॲड.महेंद्र पतकी यांचेशी संपर्क साधावा.

यावर्षीपासून खिलार जनावरांची निवड होणार मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी खिलार जनावरांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी कोसा खिलार व पांढरा खिलार असे दोन गट तयार करण्यात आले असून प्रथम क्रमांकासाठी ५ हजार रुपये व द्वितीय क्रमांकासाठी ३ हजार रुपये असे पारितोषिके देण्यात येणार आहेत.

## वासूद ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या विठाबाई चव्हाण यांची बिनविरोध निवड



सांगोला : भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली सांगोला तालुक्यातील वासूद ग्रामपंचायतीवर भाजपचा झेंडा फडकला असून भारतीय जनता पार्टीच्या ग्रामपंचायत सदस्या श्रीमती विठाबाई शिवाजी चव्हाण यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायतराज मंत्री ना.जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी नूतन सरपंचांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या ताब्यात असलेल्या वासूद ग्रामपंचायतीचे सरपंच जयश्री अरुण केदार यांनी राजीनामा दिल्यानंतर गुरुवार ३० जानेवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालयात नूतन सरपंच निवडीची प्रक्रिया पार पडली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी मंडल अधिकारी एम.जी.जाधव, तलाठी मस्के मॅडम, ग्रामविकास अधिकारी बाबासो नरळे यांनी काम पाहिले. यावेळी सरपंच पदासाठी भाजपच्या श्रीमती विठाबाई शिवाजी चव्हाण यांचा वासूद गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. वासूद गावच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. गावाचा विकास करणे हा माझा ध्यास असल्याने अधिकाधिक निधी आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे, अशी ग्वाही भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

सरपंचपदी श्रीमती विठाबाई शिवाजी चव्हाण यांची बिनविरोध निवड होताच भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला. यावेळी उपसरपंच अनिल उर्फ बंडू केदार, माजी सरपंच जयश्री अरुण केदार, माजी सरपंच कलावती संदीपान केदार, ग्रामपंचायत सदस्य बबन ऐवळे, अंकुश खटके यांच्यासह तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब एकनाथ केदार, बाळासाहेब एकनाथ केदार, मोहन विठ्ठल साळुंखे, विष्णुपंत केदार, विश्वंभर केदार, चेअरमन पांडुरंग केदार, अंकुश सावंत, मेजर अरुण केदार, सौदागर केदार, नवनाथ केदार, गोरख केदार, अजित गोडसे, समाधान सावंत, रणजित सावंत, दत्तात्रय ऐवळे, नवनाथ आदलिंगे, धनाजी राऊत, नितीन केदार, सोमनाथ पवार, गोपी केदार, जोतीराम केदार, तानाजी खटके, संभाजी चव्हाण, जयवंत केदार, बाळासाहेब केदार, दगडूआप्पा केदार, सुनील सावंत, दीपक शिंदे, सेनापती केदार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वासूद गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. वासूद गावच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. गावाचा विकास करणे हा माझा ध्यास असल्याने अधिकाधिक निधी आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे, अशी ग्वाही भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

## न्यू इंग्लिश स्कूल तालुकास्तरीय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित



सांगोला : सांगोला शहरातील नामांकित न्यू इंग्लिश स्कूल लासोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळातर्फे देण्यात येणारा तालुकास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला आहे. लोकमंगल कॉलेज वडाळा, सोलापूर येथे झालेल्या दिमाखदार कार्यक्रमात हा पुरस्कार न्यू इंग्लिश स्कूलला प्रदान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते प्रशालेतर्फे सायली खडतरे मॅडम यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामुळे न्यू इंग्लिश स्कूल च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण व नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे न्यू इंग्लिशस्कूलने शैक्षणिक क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर प्रशालेच्या प्रांगणात संस्थासंचालक डॉ. अशोकराव शिंदे यांच्या हस्ते सर्व पदाधिकारी व शिक्षकांचे गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर सोलापूर जिल्हा अध्यापक मंडळातर्फे जिल्हास्तरीय विज्ञान प्रज्ञा परीक्षेत तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल प्रशालेतील संचिता संजय देशमुख हिचा ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. सदरचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मुख्याध्यापक वसर्व शिक्षक-विद्यार्थी यांचे अभिनंदन सांगोला तालुकाशेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख, सचिव विठ्ठलराव शिंदे सर, संचालक डॉ.अशोकराव शिंदे, प्रा.दिपकराव खटकाळे, प्रा.जयंत जानकर यांनी केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## सांगोला यात्रेतील पाळणेवाल्याला खंडणी मागितल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

सांगोला : सांगोला येथील अंबिका देवीची यात्रा सुरु झालेली असून या यात्रेस भाविक दर्शनासाठी खूपच गर्दी करीत असतात. अंबिका देवी यात्रेत पाळणे लावण्यासाठी आलेल्या दोन महिला व तिच्या मुलास शिवीगाळ, मारहाण करून तुम्हाला येथे पाळणे लावायचे असतील तर एक लाख रुपयांची खंडणी द्यावी लागेल अशी धमकी दिली.या प्रकरणी वृद्ध महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार सांगोला शहरातील दोघांवर गुन्हा दाखल झाला. ही घटना बुधवारी दुपारी पावणे बाराच्या सुमारास सांगोला शहरातील मार्केट यार्ड येथे घडली आहे. अंजुबाई सोपान इंगोले (वय ७५, रा. वाढेगाव, ता. सांगोला) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बुधवारी सकाळी ११.४५ च्या सुमारास फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा नवनाथ व कमलबाई भिवा चव्हाण असे सांगोला येथील अंबिका देवी यात्रा असल्याने मार्केट यार्ड येथे पाळणे लावत होते.

आरोपी निखील गडहिरे ( रा. भीमनगर, सांगोला) व एक अनोळखी व्यक्ती ( नाव, पत्ता माहीत नाही) असे येऊन मोठ्याने आरडाओरड करू लागले. तुम्ही कोणाच्या परवानगीने पाळणे लावत आहात, तुम्हाला या ठिकाणी पाळणे लावायचे असतील तर मला एक लाख रुपये द्यावे लागतील नाहीतर तुम्हाला मी यात्रेत पाळणे लावू देणार नाही व तुमचे पाळणे चालू देणार नाही, असे म्हणून शिवीगाळी करून फिर्यादी, फिर्यादीचा मुलगा नवनाथ व कमलबाई भिवा चव्हाण यांना हाताने, लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादीस पैसे नाही दिले तर तुझ्या मुलांना गाडीखाली चिरडून मारून टाकीन अशी धमकी दिल्याची घटना घडली आहे.

याबाबत अंजुबाई इंगोले यांनी निखील गडहिरे व एक अनोळखी व्यक्ती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोसई माहुरकर तपास करीत आहेत.

## संपादकीय......

जुने वर्ष-४२ वे
अंक-९ वा

# अर्थसंकल्प एक पाऊल पुढे, पण कोणासाठी ?

र्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाची सुरुवात उच्च कृषी वाढ, उत्पादकता आणि ग्रामीण समृद्धी साध्य करण्याच्या महत्त्वासह केली. मध्यमवर्गीयांना, विशेषत: श्रीमंतांना आयकर सवलत आणि स्लॅबच्या दरांमध्ये बदल करून भरीव दिलासा मिळाला आहे, तर शेतकऱ्यांना काही चांगली आश्वासने मिळाली आहेत ज्यामुळे त्यांना अधिक उत्पन्न मिळविण्यात मदत होऊ शकते. गंमत म्हणजे, २०१५ मध्ये निवडणूक रॅलीत जाहीर केल्यापासून शेतीवरील चर्चेत मुख्य विषय असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा कोणताही संदर्भ नव्हता. सध्या उपलब्ध असलेली आकडेवारी हे उत्पन्न दुप्पट झाल्याचे दाखवत नाही. किंबहुना, अनेक प्रमुख पिकांच्या, ज्यात कडधान्ये आणि तेलबियांचाही समावेश आहे, त्यांना त्यांच्या उत्पादनासाठी यावर्षीचा एमएसपीही मिळू शकलेला नाही. सोयाबीन, तूर, चणा ही उदाहरणे आहेत.केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या समस्या सोडवता येतील असा विचार करणे अवास्तव ठरेल. अर्थव्यवस्थेची इतरही अनेक महत्त्वाची क्षेत्रे आहेत ज्यांची आव्हाने आणि संधी आर्थिक शिस्त पाळतांना हाताळल्या पाहिजेत. आर्थिक वर्ष २०२५ च्या सुधारित अंदाजानुसार, वित्तीय तूट जीडीपीच्या ४.८% पर्यंत ठेवली गेली आहे, ही साधी उपलब्धी नाही. यासाठी अर्थमंत्र्यांचे कौतुक करावे लागेल. घरगुती वापर खर्च सर्वेक्षणाच्या निष्कर्षांची दखल घेत अर्थमंत्र्यांनी भाजीपाला, फळे आणि श्री-अण्णा (बाजरीचे धान्य) यांचा वापर वाढत असल्याचे नमूद केले आहे. खरं तर, प्रक्रिया केलेल्या अन्नाचा वापर हा इतर खाद्यपदार्थांच्या तुलनेत वेगाने वाढत आहे.

२०२३-२४ मध्ये, प्रक्रिया केलेले अन्न आणि पेये यांच्यावरील खर्चाचा वाटा शहरी भागात ११.०९% आणि ग्रामीण भागात ९.८४% होता. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फळे आणि भाजीपाल्याला योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, या त्यांच्या घोषणेचे स्वागतच आहे. गेल्या दोन वर्षांत भाजीपाल्याची महागाई उच्च पातळीवर राहिली असून ती ४२ टक्क्यांवर पोहोचली आहे. आर्थिक पाहणीत टोमॅटो, बटाटा आणि कांद्याच्या किमतीला बरीच जागा दिली आहे.

स्वागतार्ह पाऊल म्हणून, अन्न प्रक्रिया मंत्रालयाच्या अर्थसंकल्पात तरतूद २,७९७ कोटी रुपयांवरून ४,३६४ कोटी रुपये करण्यात आली आहे. बिहारसाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी, आंत्रप्रेन्योरशिप अँड मॅनेजमेंटच्या कॅम्पसची घोषणा करण्यात आली आहे. राज्यात अन्न प्रक्रिया फारशी होत नाही आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेसाठी हे एक आदर्श स्थान नाही. बिहारमध्ये (फॉक्स नट) मखाना बोर्डाची स्थापना, तथापि, त्याच्या लागवडीत गुंतलेल्या लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत आवश्यक भेट असेल. मधुबनी आणि दरभंगा हे मखानाचे प्रमुख उत्पादक आहेत ज्यांचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी आहे. बिहारच्या मिथिला मखानाला २०२२ मध्ये सरकारने भौगोलिक संकेत (जीआय) टॅग प्रदान केला होता.

भारतीय कृषी संशोधन परिषदेचे दरभंगा येथे मखानासाठी राष्ट्रीय संशोधन केंद्र आहे परंतु ते खरोखरच उत्पादकांच्या अपेक्षेप्रमाणे राहिले नाही. छछ ला एक नियमित, पूर्णवेळ संचालक असेल आणि मखाना बोर्ड छछ च्या सहकार्याने काम करेल अशी आशा आहे. खाजगी गुंतवणुकीला आकर्षित करण्याची गरज आहे जेणेकरून तिची पुरवठा साखळी सुधारू शकेल आणि उत्पादकांना किफायतशीर भाव मिळू शकतील.

बऱ्याच काळापासून असा युक्तिवाद केला जात आहे की संशोधन आणि विकासासाठी वाटप वाढवावे लागेल. तथापि, कृषी संशोधन आणि विकास विभागाने त्याच्या वाटपात केवळ किरकोळ वाढ केली आहे. हवामानास अनुकूल बियाण्यांच्या वाणांचा विकास करण्यासाठी, खड-ठ ला सुबक मदतीची आवश्यकता आहे. कडधान्य आणि तेलबियांमध्ये आत्मनिर्भर बनण्याची आकांक्षा कौतुकास्पद आहे. गेल्या दहा वर्षांत सरकारने कडधान्ये आणि तेलबियांसाठी देखणा चढ्ढ जाहीर केला आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी या आवाहनांना प्रतिसाद दिला आणि मोहरी आणि तूर इत्यादीं खालील क्षेत्र वाढवले. परंतु, एमएसपीचे संरक्षण केले गेले नाही, आणि शेतकऱ्यांना लाभदायक किंमती मिळू शकल्या नाहीत.

खरेतर, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि ओडिशाच्या विधानसभा निवडणुकांदरम्यान भाताला सुमारे ९०० रुपये प्रति क्विंटल बोनस जाहीर करण्यात आला होता, परंतु तेलबिया आणि कडधान्यांसाठी असे कोणतेही प्रोत्साहन जाहीर करण्यात आले नव्हते. शेतकऱ्यांशी करार करून एमएसपीवर डाळ खरेदी करण्याची अर्थसंकल्पीय घोषणा प्रत्यक्षात येईल आणि आयात शुल्क इतके निश्चित केले जाईल की डाळींची जमीन किमान किंमत एमएसपीपेक्षा कमी होणार नाही.

अर्थसंकल्पात अनेक स्वागतार्ह उपक्रमांची घोषणा करण्यात आली आहे आणि आम्हाला आशा आहे की शेतीचा विकास दर वर्षी किमान ४% दराने होत राहील.

## बजेट वार्ता

### टॉप १० २०२५ चे बजेट:१२.७५ लाखांपर्यंतच्या कमाईवर कोणताही कर नाही, मोबाईल फोन व ईव्ही स्वस्त होतील

१. प्राप्तिकर : नवीन कर प्रणालीनुसार, आता नोकरदारांना १२.७५ लाख रुपयांपर्यंतच्या कमाईवर कोणताही कर भरावा लागणार नाही.ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांवरून १ लाख करण्यात आली आहे.पुढील आठवड्यात सरकार नवीन आयकर विधेयक सादर करणार आहे.

२. स्वस्त-महाग इव्ही बॅटरी उत्पादनासाठी करमुक्त भांडवली वस्तूंच्या यादीमध्ये ३५ अतिरिक्त वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे ईव्ही स्वस्त होऊ शकते.२८ अतिरिक्त वस्तूंचा समावेश मोबाईल फोन बॅटरी उत्पादनासाठी करमुक्त भांडवली वस्तूंच्या यादीत करण्यात आला आहे. यामुळे मोबाईल स्वस्त होऊ शकतात.सरकारने ३६ जीवरक्षक औषधांवरील कस्टम ड्युटी हटवली आहे. त्यामुळे ही औषधे स्वस्त होतील.इंटरएक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले महाग असतील. सरकारने कस्टम ड्युटी १०% वरून २०% केली आहे.

३. शेतकरीः १०० जिल्ह्यांमध्ये धनधान्य योजना सुरू करण्यात येणार आहे. या अंतर्गत १०० जिल्हे समाविष्ट केले जातील, जेथे उत्पादन कमी आहे.किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख रुपये करण्याची घोषणा. सध्या कार्डची कमाल मर्यादा ३ लाख रुपये आहे..

४. व्यवसायः लघु आणि मध्यम उद्योगांसाठी कर्ज हमी कवच ५ कोटींवरून १० कोटी रुपये करण्यात येणार आहे.नोंदणीकृत सूक्ष्म उद्योगांसाठी ५ लाख रुपयांच्या मर्यादेसह नवीन क्रेडिट कार्ड आणण्याची घोषणा.

खेळण्यांच्या निर्मितीसाठी मेक इन इंडिया अंतर्गत योजना सुरू करण्यात येणार आहे.रस्त्यावरील विक्रेत्यांसाठी सुरू असलेल्या पीएम स्वानिधी योजनेची कर्ज मर्यादा ३० हजार रुपये करण्यात येणार आहे.

५. शिक्षणः सर्व सरकारी माध्यमिक शाळा ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटीने जोडल्या जातील.५०० कोटी रुपये खर्चून एआय शिक्षणाशी संबंधित उत्कृष्टतेची केंद्रे स्थापन केली जातील.येत्या ५ वर्षांत वैद्यकीय महाविद्यालयात ७५ हजार जागांची भर पडणार आहे. पुढील वर्षी १० हजार जागांची भर पडणार आहे.

६. पर्यटन आणि कनेक्टिव्हिटीः उडान योजनेद्वारे पुढील १० वर्षांत १२० नवीन शहरे जोडण्याची योजना.

बिहारमध्ये ग्रीनफिल्ड विमानतळ प्रकल्प सुरू करण्याच्या योजनेची घोषणा.राज्यांच्या भागीदारीत ५० प्रमुख पर्यटन स्थळे विकसित केली जातील.हील इन इंडिया' योजनेतून वैद्यकिय पर्यटनाला चालना दिली जाणार आहे.

७.आरोग्यः पुढील ३ वर्षांत सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे-केअर कॅन्सर केंद्रे सुरू करण्याची योजना आहे. २०२५-२६ मध्ये २०० डे-केअर कॅन्सर केंद्रे बांधली जातील.सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी प्रदान केली जाईल.गिग कामगार (ज्यांची कामे तात्पुरती आहेत) जन आरोग्य योजनेशी जोडले जातील.

८. पायाभूत सुविधाः पायाभूत सुविधांच्या विकासासाठी राज्य सरकारांना १.५ लाख कोटी रुपये मिळतील. हे ५० वर्षांसाठी व्याजमुक्त कर्ज असेल.कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यासाठी ५०० कोटी रुपये वाटप केले जातील.२०२५-३० साठी नवीन मालमत्ता मुद्रीकरण योजना. यामुळे पायाभूत सुविधा प्रकल्पांना निधी देण्यासाठी १० लाख कोटी रुपये जनरेट होतील.

९. महिलाः ५ लाख महिला आणि अनुसूचित जाती/जमाती उद्योजकांसाठी एक नवीन योजना सुरू करण्याची घोषणा केली आहे. याअंतर्गत, स्वस्त व्यवसाय कर्ज उपलब्ध होईल.पहिल्यांदाच उद्योजकांना ५ वर्षांत २ कोटी रुपयांचे मुदत कर्ज मिळेल.सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० योजनेअंतर्गत, ८ कोटी मुली आणि १ कोटी गर्भवती आणि स्तनपान देणाऱ्या महिलांना पोषण सहाय्य मिळेल.

१०. अणू मोहीमः २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा विकसित करण्याचे अभियान सुरू करण्याची घोषणा.हे ध्येय साध्य करण्यासाठी, खाजगी क्षेत्रासोबत सक्रिय भागीदारी केली जाईल.घोषणा.

## सुविचार

पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही. आपले अंतरंग खुले करते. कधी चुकवत नाही की फसवत नाही.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सर्वसामान्य जनतेचे आभार मानण्यासाठी व सांगोला तालुक्यातील ग्रामीण जनतेचे प्रश्न जाणून घेण्यासाठी आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांचा लवकरच अधिकारी व पदाधिकारी यांच्यासमवेत गावभेट दौरा



सांगोला : विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर सर्वसामान्य जनतेचे आभार मानण्यासाठी व सांगोला तालुक्यातील ग्रामीण जनतेचे प्रश्न जाणून घेण्यासाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी अधिकारी व पदाधिकारी यांच्यासमवेत लवकरच गावभेट दौऱ्याचे आयोजन करण्यात आले असून या दौऱ्यात नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्या सोडविण्यावर भर देणार असल्याची माहिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक बुधवार दि.२९ रोजी डॉ.भाई. गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणीच्या कार्यस्थळावर संपन्न झाली. यावेळी यावेळी मा.चिटणीस विठ्ठलराव शिंदे, चिटणीस दादासाहेब बाबर, डॉ.प्रभाकर माळी, श्री.समाधान पाटील, इंजि.रमेश जाधव यांच्यासह सर्व प्रमुख संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, सरपंच, उपसरपंच, महिला पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ.बाबासाहेब देशमुख बोलत होते. तालुक्यातील विविध गावांमध्ये सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने असणाऱ्या निरनिराळ्या अडचणी,मूलभूत व पायाभूत प्रगतीच्या संदर्भात असणारे प्रश्न आणि समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावरती आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आ डॉ.बाबासाहेब देशमुख यांचा तालुक्यातील सर्व शासकीय विभागांचे प्रशासकीय अधिकारी, प्रमुख पदाधिकारी यांचे समवेत सांगोला तालुक्यातील नियोजित रूपरेषेनुसार गावभेट दौरा संपन्न होणार आहे. गावभेट दौऱ्यात सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या आ.डॉ. बाबासाहेब देशमुख हे ऐकून घेणार आहेत आणि त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्वरित प्रयत्न करणार आहेत.

या मोहिमेप्रसंगी तहसील, पंचायत समिती, नगरपालिका, मंडख अधिकारी, महावितरण, भुमिअभिलेख, पोलिस स्टेशन, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम, उपजिल्हा रुग्णालय आदी विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार असून, नागरिकांच्या समस्या व संबंधित अधिकाऱ्यांना समोरासमोर चर्चा घडवून समस्यांचे निराकरण केले जाणार आहे. शेतकरी कामगार पक्षाने आजपर्यंत गोरगरीब, सर्वसामान्य जनतेची बांधिलकी जोपासली आहे. सांगोला तालुक्यातील ग्रामीण जनतेचे प्रश्न जाणून घेण्यासाठी लवकरच गावभेट दौऱ्याचे नियोजन करण्यात येणार असून गावभेटीचे नियोजन प्रसिध्दीपत्रकाव्दारे प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्यानुसार प्रत्येक गावातील ग्रामस्थांनी या गावभेट दौऱ्यादरम्यान आपल्या वैयक्तिक व सार्वजनिक अडीअडचणी लेखी स्वरूपात मांडाव्यात,असे आवाहन आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नवीन लोकप्रतिनिधी या नात्याने मतदारसंघातील जनतेच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्यक्रम देत असताना सर्वसामान्य जनता व आमदार यांच्यामधील दरी कमी व्हावी, तळागाळातील समस्या डोळ्याने पाहणे, समक्ष जनतेला भेटून समजून घेणे या प्रामाणिक उद्देशाने आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख हे 'आमदार सर्वसामान्य जनतेच्या दारी' या मोहिमेंतर्गत घरापर्यंत जाऊन नागरिकांना भेटणार आहेत. यापूर्वी स्व.भाई.गणपतराव देशमुख हे सुध्दा अधिवेशनाच्या पूर्वी गाव भेट दौऱ्याच्या निमित्ताने जनतेशी संवाद साधून प्रश्न जाणून घेत होते.

स्व.भाई.गणपतराव देशमुख यांच्या गावभेट दौऱ्याला उत्तम प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे शेकापचे नवनिर्वाचीत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या गाव भेट दौऱ्यामध्ये तालुक्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी व पदाधिकारी सोबत असल्याने या ही दौऱ्यामध्ये जनतेचे प्रश्न ऑन द स्पॉट उसोडवले जाण्याची पूर्ण तयारी करण्यात येत आहे. पहिल्या दोन दिवसात स्वतः आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व पक्षाचे पदाधिकारी गावात जावून नागरिकांचे आभार मानणार आहेत. एका गणातील गावासाठी तीन ते चार तास देण्यात येणार असून दोन गण एका दिवशी पूर्ण करण्यात येणार आहेत. स्वागत चिटणीस दादाशेठ बाबर यांनी केले. बैठकीस शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पुरोगामी युवक संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे अभियांत्रिकी पदविका हिवाळी परीक्षा २०२४ मध्ये उत्तुंग यश

सांगोला : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभियांत्रिकी पदविका हिवाळी परीक्षा २०२४ मध्ये शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले असल्याची माहिती संस्थेचे सचिव श्री अंकुश गायकवाड व प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख यांनी दिली.

यामध्ये एकूण.७६८ विद्यार्थ्यांनी हिवाळी परीक्षा दिली. त्यापैकी ४५ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत, तसेच एकूण ६ विद्यार्थ्यांनी विविध विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत.प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकेचा निकाल ९०.४९% टक्के लागला असून द्वितीय वर्षाचा निकाल ६९.७१% टक्के लागला आहे. तर अंतिम वर्षाचा निकाल ७७.७९ टक्के लागला आहे. अंतिम वर्षातील अभियांत्रिकीच्या अभय गायकवाड (९५.०३), प्रथम क्रमांक, प्रांजली इंगोले ९४ टक्के द्वितीयउ क्रमांक, स्वप्नाली पाटील (९३.६७) तृतीय क्रमांक, व द्वितीय वर्षातील अभियांत्रिकी पदविकेच्या आशुतोष कोडक (९४.८२) यांनी प्रथम क्रमांक, शुभम माने (९३.५३), द्वितीय क्रमांक, स्वप्नाली शिंदे(९३.४४) हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकेच्या अमृता मिसाळ हिने (९३.१८), यांनी प्रथम क्रमांक, मृदुला पाटील (९३.०६), द्वितीय क्रमांक, गायत्री मिसाळ (९३.०६) तृतीय क्रमांक, मिळवला आहे. प्रथम वर्षातील ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे अमृता मिसाळ (९३.१८), मृदुला पाटील (९३.०६), तनुजा मोरे (९२.१२), नेहा लेंडवे (९१.७७), नीनत मुलानी (९१.०६), दीक्षा चव्हाण (९०.९४), गौरी नवले (९०.८२), साक्षी शेटे (९०.८२), गायत्री मिसाळ (९३.०६), सृष्टी काशीद (९१.१८), गौर जाधव (८९.८८). द्वितीय वर्षातील विद्यार्थी पुढील प्रमाणे अशितोष कोडक (९४.८२), शुभम माने (९३.५३), ऋषिकेश शेंडगे (९२.८२), वैष्णवी भोसले (९२.३५), साक्षी मेखले (९१.६५), यशराज देशमुख (९१.३५), अविनाश गव्हाणे (९१.२९), तहूरा मुल्ला (९०.५९), शाहिद मुजावर (८९.६५), शितल सावंत (९२.३३), उस्वप्नाली शिंदे (९३.४४), गौरी काटे (९२.८९), गुरुप्रसाद कदम (९१.८८). अभियांत्रिकी पदविकेच्या अंतिम वर्षातील डीपी वर्षातील अभय गायकवाड (९५.०३), सुशांत काशीद (९३.०३), तनुजा मोरे (९३.०१), अजित गायकवाड (९१.०६), ऋतुजा मोहिते (९०.०३), प्रांजली इंगोले (९४), स्वप्नाली पाटील (९३.६७), प्रवीण घाडगे (९२.८९), कोमल सुरवसे (९२.११), आर्या देशमुख (९२.११), सानिका पवार (९२.११), स्नेहल दिवसे (९१.२२), सायली गव्हाणे (९०.११), वैष्णवी चक्रे(८९.८९), सानिका इंगवले (८९.६८), अक्षता बाबर (९३.३७), मेघा गायकवाड (९२.२१), तनुश्री खटकाळे (९२.११), पल्लवी लिगाडे (९१.३७), प्रताप बुरंगे (९०.९५), तुषार दिघे (९०.७६). बेसिक मॅथेमॅटिक्स या विषयात नेहा लेंडवे, सृष्टी काशीद, गौरी जाधव. डी. एस. यु .विषयात शुभम माने, ए.जे.पी. या विषयात पूनम माने, एम. डब्ल्यू. सी. या विषयात अक्षदा बाबर या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून कॉलेजचा नाव लौकिक वाढवला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष श्री बाबुराव गायकवाड, सचिव श्री अंकुशराव गायकवाड, विश्वस्त डॉ.यशोदिप गायकवाड, सर्व विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ.आर.ए. देशमुख यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# सांगोला विद्यामंदिरमध्ये मतदार जनजागृती रॅली संपन्न



सांगोला : सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, सांगोला यांच्यावतीने दि.२५ जानेवारी 'राष्ट्रीय मतदार दिवस' यानिमित्ताने सांगोला शहरांमधून मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. 'वोट की किंमत कभी ना लेंगे,परंतु अपना वोट अवश्य देंगे', 'छोड दो अपने सारे काम, पहले करे अपना मतदान', अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती केली. सांगोला विद्यामंदिरच्या प्रांगणातून सुरू झालेली मतदार रॅली तहसील कार्यालय, जयभवानी चौक, नेहरू चौक, छत्रपती शिवाजी चौक या ठिकाणाहून पुन्हा प्रशालेत आली.

या रॅलीमध्ये प्रशालेतील एन.सी.सी. कॅडेट, स्काऊट- गाईड, एस.आर.पी. मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, मच्छिंद्र झंोले, सुरेश मस्तुद यांच्या मार्गदर्शनाखाली मकरंद अंकलगी, उज्वला कुंभार, संध्या तेली यांनी रॅली संपन्न करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# श्री.अंबिकादेवी यात्रेनिमित्त आज रंगभरण स्पर्धा तर उद्या रांगोळी स्पर्धा

सांगोला : श्री.अंबिकादेवी यात्रा व प्रदर्शन समिती, सांगोला यांचेवतीने श्री.अंबिकादेवी यात्रा निमित्त आज रविवार दि.२ फेब्रुवारी रंगभरण स्पर्धा तर उद्या सोमवार दि.३ फेब्रुवारी रोजी रांगोळी स्पर्धा आयोजीत करण्यात आली असल्याची माहिती कोर्ट रिसिव्हर्स अंबिकादेवी यात्रा व प्रदर्शन समिती, सांगोला यांचेवतीने देण्यात आली. आज रविवार दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता इ.१ ली ते ४ थी गटासाठी रंगभरण स्पर्धा, इ.५ वी ते.७ वी गटासाठी चित्रकला स्पर्धा व इ.८ वी ते १० वी गटासाठी चित्रकला स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकासाठी ७०० रुपये, व्दितीय क्रमांकासाठी ५०० रुपये तर तृतीय क्रमांकासाठी ३०० रुपयांचे पारितोषिक प्रत्येक गटासाठी देण्यात येणार आहे. उद्या सोमवार दि.३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता इ.५ वी ते ७ वी गटासाठी ठिपक्यांची रांगोळी, इ.८ वी ते इ.१० वी गटासाठी ठिपक्यांची रांगोळी तर खुला गटासाठी संस्कार भारती स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे. इच्छुक स्पर्धकांनी सदर स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन यात्रा समितीचे वतीने करण्यात आले आहे.

. सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी कोर्ट रिसीव्हर्स हाय्यक सरकारी वकील ॲड.सारंग वांगीकर (मो.९४२०६६६५५१), ॲड.विक्रांत बनकर (मो.९३०७९५५४५५), ॲड. विशालदीप बाबर (मो.९८२२२७३४८०,), ॲड.नितीन बाबर (मो.९४०५४३७८२२), ॲड.सौ.शशिकला खाडे (मो. ८५५२८१५५९९), ॲड.महेंद्र पतकी (मो.९४०३९३८७९४) यांचेशी संपर्क साधावा.

२४ तास ॲम्ब्युलन्स सेवा
विजय-लक्ष्मी कार्डिॲक ॲम्ब्युलन्स सर्व्हिस
AC/NON AC योग्य दरात उपलब्ध
Vijaylaxmi Cardiac Ambulance
AC/NON AC

सांगोला शहरात ५ मिनिटात हजर
संपर्क:- 7276070722

# जलजीवन मिशन कामाच्या अनेक तक्रारी असल्यामुळे जिल्हास्तरीय बैठक घेऊन अडचणी सोडवणार

## आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे उपस्थितीत आढावा बैठक संपन्न

सांगोला : शिरभावी नळ पाणीपुरवठा लाईट बील, पाणीपट्टी तसेच बीला वरील व्याज कमी करणे बाबत सरपंच व ग्रामसेवक तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी यांची स्वतंत्र बैठक घेण्यात घेऊन तोडगा काढण्यात येईल.त्याचप्रमाणे जलजीवन मिशन कामाच्या अनेक तक्रारी असल्यामुळे जिल्हास्तरीय बैठक घेऊन अडचणी सोडवण्यात येणार असल्याची माहिती आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी बचत भवन पंचायत समिती सांगोला येथे दुपारी २ वाजता तालुक्यातील सरपंच ,ग्रामपंचायत अधिकारी , पंचायत समिती अधिनस्त विभाग प्रमुख तसेच विस्तार अधिकारी सर्व यांची विविध विकास कामासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती शिरभावी नळपाणी पुरवठा योजना , जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्र दुरुस्ती, औषध साठा आरोग्य केंद्रातील सोयी सुविधा, सार्वजनिक शौचालय, शालेय पोषण आहार, शाळा इमारत बांधकाम निर्लेखन करावयाच्या इमारती , प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, राज्य पुरस्कृत घरकुल योजना रमाई, घरकुल योजना जागा बक्षीस पत्र, जागा अडचणी, घरपट्टी, पाणीपट्टी वसुली, शाळा अंगणवाडी स्वच्छतागृह ,पिण्याचे पाणी, व संभाव्य पाणी टंचाई , अकांक्षीत तालुका कार्यक्रमाच्या फेलो अनुजा गावडे यांनी या बाबत या विषयावर बैठकीत चर्चा करण्यात आली व त्यातील अडचणी जाणून घेण्यात आल्या.

यावेळी गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी , सहाय्यक गटविकास अधिकारी वसंत फुले, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर अविनाश खांडेकर ,उपअभियंता बांधकाम अतुल लेंडवे, उपअभियंता पाणीपुरवठा सेनापती केदार, बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिजीत मोलानी, गटशिक्षणाधिकारी अमोल नवले , विस्तार अधिकारी पंचायत देवराव पुकळे, विस्तार अधिकारी पंचायत अमोल तोडकरी, विस्तार अधिकारी सांख्यिकी पुंडलिक गंगंदे, विस्तार अधिकारी आरोग्य मिलिंद सावंत , विस्तार अधिकारी शिक्षण अमोल भंडारी, उपस्थित होते.

यानंतर गटविकास अधिकारी कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली २०२५-२० २६ जीपीडीपी आराखडा वेळेत पूर्ण केले बद्दल ग्रामपंचायत सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे अभिनंदन देवराव पुकळे यांनी केले. यानंतर मिलिंद सावंत यांनी आभार मानले.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक
माणदेश वार्ता

# भुयारी गटार विषयी काही अडचणी किंवा समस्या असल्यास नगरपरिषदेस संपर्क साधावा-मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी

सांगोला : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत सांगोला शहाराच्या मलनिःस्सारण प्रकल्प योजना राबविणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाची किंमत रु.१४५,०५,४३,११७/- इतक्या रकमेस मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांनी दिनांक ०७/०८/२०२३ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. सदर कामाअंतर्गत सांगोला शहराची ३ झोन मध्ये विभागणी केली आहे.

त्यानुसार सांगोला शहराच्या मलनिःस्सारण प्रकल्प टप्पा क्र.१ मध्ये वर्कींग सर्व्हे, झोन २ मधील विविध ठिकाणी मलजलवाहिनी अंथरणेकरिता १५० मि.मी. व्यास ते ६०० मि.मी. व्यासाची HDPE DWCSN4SN8, RCC पाईपची एकुण लांबी ११७.५४ कि.मी समावेश आहे.ट्रंकमेन, पंपिंग स्टेशन मलशुद्धीकरण केंद्र यांचा समावेश आहे. तसेच २ जेटिंग कम सक्शन मिशनचा समावेश आहे.शहरातील काही प्रभागातून सांडपाणी गोळा करण्याची व्यवस्था देखील करण्यात येणार असून उर्वरित प्रभागाकरिता मुख्य वाहिनीद्वारे सांडपाणी एका नाल्यात एकत्र केले जाणार आहे.

हा नालामलशुद्धीकरण केंद्राजवळ अडवून त्या ठिकाणी सांडपाणी ८.५ चडऊ क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्रामध्ये घेऊन त्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. सदर कामाच्या टप्पा क्र.२ मध्ये माने वस्ती व भुईटे वस्ती येथे वेटवेल असून उर्वरीत मल जलवाहिन्यांची व्यवस्था करून प्रथम टप्प्यामध्ये निर्माण केलेल्या मलप्रक्रिया व्यवस्थेस जोडण्यात येणार आहे. महाराष्ट्र सुवर्णजयंतीनगरोत्थानमहाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत सांगोला शहाराच्या मलनिःस्सारण प्रकल्प टप्पा क्र.१ योजना राबविणेस रक्कम रु.९६.६३ कोटी इतक्या रक्कमेस शासनाने दिनांक १९/१०/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन मे.व्हिस्टाकोर इंन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि.पुणे यांना दिनांक ०७/०३/२०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. दिनांक ११/०३/२०२४ रोजीपासून सबंधित ठेकेदार यांनी प्रत्यक्ष कामास सुरुवात केली असून त्यापैकी वर्कींग सर्व्हेचे काम पुर्ण केले आहे.

सदर योजनेअंतर्गत शहरात विविध ठिकाणी HDPE DWC १५० चच व्यासाची पाईपलाईन ५२६१३ मीटर, HDPE DWC २५०चच व्यासाची पाईपलाईन ११५.५ मीटर तसेच RCC ४५० चच व्यासाची पाईपलाईन ४११.५ मीटर टाकण्यात आली आहे. व १९५० Manhole पूर्ण झाले असून 52 Manhole चे काम सुरू आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी ८०५ Property Chambe पूर्ण झाले असून 23Property Chamber चे काम सुरू आहे. तरी सांगोला शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भुयारी गटार विषयी काही अडचणी किंवा समस्या असल्यास तात्काळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी किंवा बांधकाम अभियंता यांना संपर्क करुन त्याबाबत सुचित करावे आणि कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.

# भावपूर्ण श्रध्दांजली



कै. स्नेहा मारूती सोनवणे
जन्म दि. ५/०३/१९९१
मृत्यू दि. ०४/०२/१९९६ माघ पौर्णिमा



* तुझेच *

आई, काकू, आप्पा, वहिनी,
नन्नी, आबुजी, भैय्या,ताई,आक्का,
दिदी, बापू, श्रध्दा, पूजा

सोनवणे परिवार, सांगोला